शैक्षणिक वर्ष सन २००९-२०१० पासून शैक्षणिक व अन्य शुल्क
शुल्क नियंत्रण समितीच्या मंजूरीशिवाय न वाढविणेबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २००९/(१०८/०९)/माशि ३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ८ मे, २००९

**प्रस्तावना :** टी.एम.ए. पै फाऊंडेशन प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने शासन निर्णय, दिनांक २७ मे,२००३ अन्वये खाजगी विना अनुदानित/कायम विना अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील प्रवेश, आरक्षण, शुल्क व सवलती इत्यादी संदर्भातील आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यात खाजगी विना अनुदानित/कायम विना अनुदानित शाळातील फी ठरविण्याचे अधिकार संस्थेला असून, ते पालक शिक्षक संघटनेच्या सहमतीने ठरवावयाचे आहेत. तथापि, यात पालक शिक्षक संघाकडून काही तक्रारी आल्यास त्याची दखल संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घेऊन फी चे दर निश्चित करावयाचे आहेत. तथापि, राज्यातील खाजगी कायम विना अनुदान/विना अनुदान तत्वावर चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकडून आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्क तसेच अन्य शुल्कामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून, यामुळे पालकांची आर्थिक पिळवणूक होत असून या संदर्भातील बरीच निवेदने शासनास प्राप्त होत आहेत. राज्यामध्ये आयसीएसई/ सीबीएसई/ आयजीसीएसई/आयबी या मंडळाशी संलग्नित शाळा सुरु करण्याकरिता राज्य शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र दिले जाते. यानंतर या शाळा संबंधित अभ्यासमंडळाकडून संलग्नतचे आवश्यक ते प्रमाणपत्र प्राप्त करुन घेत असतात. या शाळादेखील मोठ्या प्रमाणावर फी आकारीत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या आहेत. तसेच या संदर्भात मागील अधिवेशनामध्ये लोक प्रतिनिधींनी सभागृहात प्रश्न, लक्षवेधी सूचना उपस्थित केल्या होत्या. या शाळांद्वारे मोठ्या प्रमाणावर आकारण्यात येणाऱ्या फीला आळा बसण्याकरिता उपाययोजना केली जावी याकरिता शासन स्तरावर सातत्याने मागणी केली जात होती.

**शासन निर्णय :** कायम विना अनुदान/विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळा तसेच आयसीएसई/ सीबीएसई/ आयजीसीएसई/आयबी या शाळा इतर अभ्यासक्रमाशी सलंग्नता असलेल्या शाळांकडून केली जाणारी आर्थिक लूट व केली जाणारी प्रचंड फी वाढ या अनुषंगाने शासनास प्राप्त निवेदने व मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक ४५०३/२००९ दाखल झालेल्या रिट

याचिकेवरील झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे:-

"राज्यात सुरु असलेल्या कायम विना अनुदान तत्वावरील/विना अनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये तसेच आयसीएसई/ सीबीएसई/ आयजीसीएसई/आयबी मंडळाशी संलग्न असलेल्या व त्याकरिता शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र दिलेल्या शाळांना, शासनामार्फत गठीत केल्या जाणाऱ्या शुल्क नियंत्रण समितीच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची फी वाढ करता येणार नाही. शाळेचे शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क निश्चित करण्याकरिता शासनातर्फे शुल्क नियंत्रण समिती स्थापन करण्यात येणार असून, सदर समितीची मंजूरी असल्याशिवाय संबंधित संस्थांना शैक्षणिक व इतर शुल्कामध्ये वाढ करता येणार नाही. या आदेशापूर्वी **सन २००९-२०१०** या शैक्षणिक वर्षाकरिता ज्या संस्थांनी फी वाढ केली असेल त्यांनाही वरील समितीची मंजूरी घेणे बंधनकारक राहील व शुल्क नियंत्रण समिती, निश्चित करेल तेच शुल्क शाळेस आकारता येईल. शासनाच्या या आदेशाविरुद्ध कोणत्याही शाळेने या शैक्षणिक वर्षापासून म्हणजे **सन २००९-२०१०** पासून शैक्षणिक शुल्कात वाढ केल्यास संबंधित शाळेची परवानगी रद्द करण्यात येईल तसेच ज्या शाळांना शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे ते ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल व तसे संबंधित मंडळांना कळविण्यात येईल.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.maharashtra.gov.in वर उपलब्ध असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २००९०५०८१८०२१५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अ. मा. भट्टलवार )
शासनाचे सह सचिव

प्रति,
शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक ( प्राथमिक ), महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी ( प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद,
शिक्षण निरिक्षिक ( पश्चिम/उत्तर/दक्षिण ), मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
आयसीएसई/सीबीएसई/आयजीसीएसई/आयबी
मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक
निवड नस्ती माशि ३